कार्यालय पोलीस ठाणे अंबड

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** जालना **P.S.(ठाणे):** अंबड **Year (वर्ष):** 2020

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0235 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 13/05/2020 21:05 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** बुधवार **Date From (दिनांक पासून):** 13/05/2020
**Time Period (कालावधी):** पहर 5 **Date To ( दिनांक पर्यंत):** 13/05/2020
**Time From (वेळेपासून):** 13:21 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 13:21 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 13/05/2020 **Time (वेळ):** 20:54 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**
**Entry No. (नोंद क्र.):** 019 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 13/05/2020 20:54 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** Oral

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** पूर्व, 1 किमी
**Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** प्रिन्स लज जवळ अंबड जि जालना

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** अशोक कारभारी पवार

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1971 (d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (दिल्याची तारीख):**
**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**



Scanned by CamScanner

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ. क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | पानेगाव ,अंबड ,जालना,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | पानेगाव ,अंबड ,जालना,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):** 91-7620372433

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | जन पांडीयन पिल्ले पोहेका 1018 | | | 1. रामनगर कलनी, जालना,अंबड ,जालना, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | लाचेची रक्कम न्थ्रासिन पावडर लागलेली . | 7,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):** 7,000.00

11 **Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ. क्र.) | UIDB Number (यु.आय.डी. बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद जालना दिनांक 13.05.2020.मी अशोक कारभारी पवार, वय 49 वर्ष, व्यवसाय शेती, रा.पानेगाव, ता.अंबड, जि.जालना. मोबाईल नंबर 7620372433.दिनांक 11.05.2020 रोजी मी अंबड येथुन लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे पोलीस उपअधीक्षक श्री.निकाळजे साहेब यांना मोबाईल फोनव्दारे संपर्क साधुन माझ्यावर पोलीस स्टेशन अंबड येथे गुन्हा दाखल असुन सदर गुन्हयात गुन्हयाचे तपास अधिकारी जमादार पिल्ले साहेब हे सदर गुन्हयात आम्हास अटक न करण्यासाठी व गुन्हयात मदत करण्यासाठी लाच मागत आहे. त्यावरुन लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे अधिकारी हे अंबड येथे सुरक्षित ठिकाणी आले असतांना त्यांचे समक्ष व दोन पंचा समक्ष हजर येऊन तक्रार देतो की, मी वरील ठिकाणी राहणारा असुन शेती व्यवसाय करतो. मला तीन भाऊ असुन सगळे अलग अलग गावातच राहतात. मी एकटा शेतात राहतो. शेतात जनावरांसाठी ज्वारीचा व मक्याच्या चा-याच्या वळाया केलेल्या असुन चा-याची साठवणुक केलेली आहे. त्या चा-याच्या वळायाच्या बाजुला 25 पी.व्ही.सी.पाईपच्या छेडया ठेवलेल्या होत्या. आमच्या शेताच्या बाजुला आमच्या भावकीतलेच 1.रावसाहेब मोहनसिंग पवार 2.शिवसिंग मोहनसिंग पवार यांची शेती आहे.दिनांक 22/04/2020 रोजी मी शेतात नसतांना 1.रावसाहेब मोहनसिंग पवार 2.शिवसिंग मोहनसिंग पवार यांनी त्यांच्या शेतातील पळाटयाचे फास पेटवुन दिले. पेटलेले फासाची आग वा-याच्या झोकाने आम्ही जनावरासांठी साठवुन ठेवलेल्या चा-याच्या वळाईकडे येवुन चारा व त्याबाजुला ठेवलेल्या पी.व्ही.सी.पाईपच्या छेडया जळुन गेल्या. त्यावेळी तेथे माझी पत्नी हजर होती. ती सदर ईसमांना बोलण्यास गेली असता त्यांनी माझ्या पत्नीस मारहाण केली व शिवसिंग पवार यांने स्वत:चे डोके फोडुन घेवुन आमचे विरुध्द अंबड पोलीस स्टेशनला जाऊन मारहाण केल्या बाबत तक्रार दिली. त्यांचे तक्रारीवरुन दिनोक 22/04/2020 रोजी पोलीस ठाणे अंबड येथे गुरन 173/2020 कलम 324,323,504,506,34 भादवी प्रमाणे 1.अशोक कारभारी पवार 2.भिमराव कारभारी पवार 3.राजश्री अशोक पवार 4.मालाबाई भिमराव पवार अशा आमचे चौघा विरुध्द मारहाण केल्या बाबत गुन्हा दाखल करण्यात आला. सदर गुन्हयाचा तपास जमादार पिल्ले साहेब करत असल्याचे आम्हाला समजले. गुन्हा दाखल झाल्यानतर दिनाक 08/05/2020 रोजी पोलीस स्टेशन अंबडचे जमादार पिल्ले साहेब यांनी मोबाईल फोनव्दारे माझ्यांशी संपर्क साधुन म्हणाले की, तुम्हाला अटक करावयाची आहे. अटक करायची नसल्यास व तुम्हाला गुन्हयात मदत करण्यासाठी प्रत्येकी 10,000/- रु.असे चौघांचे 40,000/- रु.दयावे लागतील. अशी पैशाची मागणी केल्यांने व माझ्या जवळ एवढे पैसे नसल्यांने मी त्यांना माझ्या जवळ एवढे पैसे नाहीत साहेब काही कमी करा असे म्हणाल्यावर त्यांनी शेवटी 20,000/- रु.घेण्याचे ठरले परंतु माझ्या जवळ पैसे नसल्यांने व मी पैसे न दिल्यांने पिल्ले साहेब मला रोज फोन करीत होते.माझी अंबड पोलीस स्टेशनचे जमादार पिल्ले साहेब यांना लाच द्यायची इच्छा नाही परंतु लाच दिली नाही तर ते मला व माझ्या कुटुंबातील ईतर तीन सदस्य याना अटक करतील व आम्हाला गुन्हयात मदत करणार नाही. श्री.पिल्ले साहेब, जमादार पोलीस



Scanned by CamScanner

स्टेशन अंबड यांचेशी माझी वैयक्तीक दुश्मणी नाही, अगर देण्याघेण्याचा अथवा उसनवारीचा आर्थीक व्यवहार नाही. श्री पिल्ले साहेब, जमादार पोलीस स्टेशन अंबड हे माझ्याकडे मागत असलेले पैसे लाचेचे असल्याचे मला माहित आहे. मी दिनांक 11.05.2020 रोजी श्री पिल्ले साहेब, जमादार पोलीस स्टेशन अंबड यांना भेटण्यासाठी अंबड येथे जाणार असुन त्यावेळी मी त्यांना आमचे विरुध्द पोलीस स्टेशन अंबड येथे दाखल असलेल्या गुन्हयामध्ये अटक न करण्यासाठी व गुन्हयात मदत करण्याविषयी विनंती करणार आहे. त्यावेळी श्री.पिल्ले साहेब यांनी मला लाचेची मागणी करुन ते स्वत: किंवा इतरा मार्फत स्विकारल्यास त्यांना पकडून कार्यवाही करावी. त्यावरुन ला.प्र.वि.जालना येथील पोलीस उपअधिक्षक श्री.निकाळजे यानी माझी तक्रार टंकलीखीत करुन पंचाची ओळख करुन देवुन माझी तक्रार त्यांना सांगीतली होती. माझ्या तक्रारी वरुन मी जमादार श्री पिल्ले साहेब यांचे विरुध्द केलेली तक्रार खरी आहे काय व श्री पिल्ले साहेब हे माझ्याकडे लाच मागताल काय याची खात्री करण्यासाठी,लाचेच्या मागणीची पडताळणी करण्यासाठी मला व पंच श्री. बहुरे यांना अंबड येथील प्रिन्स लज येथे श्री पिल्ले साहेब यांना भेटण्यसाठी पातविण्यात आले. माझ्याकडे व्हाईस रेकर्डर मशीन सुरु करुन देण्यात आले होते. त्यावेळीचे भेटी मध्ये मी माझ्या विरुध्द पोलीस स्टेशन अंबड येथे दाखल असलेल्या गुन्हयामध्ये मला व माझ्या कुटुंबियांना अटक न करण्यासाठी व सदर गुन्हयात आम्हाला मदत करण्यासाठी चर्चा केली असता श्री.पिल्ले साहेब यांनी माझ्याकडे 20,000/-रुपयाची मागणी करुन तडजोडी अंती 15,000/- रु दि.13.05.2020 रोजी लाच स्विकारणार असल्याचे निष्पन्न झाले.तसा सविस्तर पंचनामा करण्यात आला. त्यावरुन दिनांक 13.05.2020 रोजी ला.प्र.वि.जालना येथील पोलीस उपअधिक्षक श्री.निकाळजे यांनी अंबड येथील प्रिन्स लज येथे श्री पिल्ले साहेब यांचे विरुध्द सापळा लावण्याचे ठरविण्यात आले. जालना ते अंबड रोडवर सुरक्षीत ठिकाणी शासकीय वाहनामध्ये अंथ्रासीन पावडरची माहीती देवुन मला व पंचांना त्याचे प्रात्यक्षीक दाखविण्यात आले. पोलीस जमादार श्री पिल्ले साहेब यांना लाच म्हणुन देण्यासाठी माझ्याकडे 15,000/- रु नसल्याने व माझ्याकडे उपलब्ध असलेल्या पैशातुन ला.प्र.वि.चे अधिकारी यांनी 7,000/- रुपये वेगळे काढले व त्याला अंथ्रासीन पावडर लावले. पोलीस जमादार श्री पिल्ले साहेब यांना देण्यासाठी थ्रसीन पावडर लावलेले पैसे माझ्या पन्टचे उजव्या खिशात ठेवले. सर्वांना त्यांचे काम समजावुन सांगुन सुचना देण्यात आल्या याबाबतचा पंचासमक्ष सविस्तर पंचनामा करण्यात आला. त्यावेळी मी मोबाईल फोनव्दारे श्री पिल्ले साहेब यांना पैसे घेवुन कोठे येवु असे विचारले असता त्यांनी मला प्रिन्स लज येथे येण्यास सांगीतले.त्यानंतर पोलीस उपअधीक्षक श्री निकाळजे साहेब यांनी मला सुचना दिल्या की, श्री.पिल्ले यांनी लाच स्वीकारल्यानंतर तुझ्या डोक्याला बांधलेला रुमाल गळयात टाकायचा सुचना दिल्या. त्यावरुन मला व पंच श्री.दारासिंग बहुरे यांना पोलीस जमादार श्री पिल्ले साहेब यांना भेटण्यासाठी प्रिन्स लज येथे पाठविण्यात आले. मी व पंच श्री. दारासिंग बहुरे असे ठरल्याप्रमाणे प्रिन्स लज समोर आलो. आमच्या मागेच त्याठिकाणी परिसरात पोलीस उपअधीक्षक श्री.निकाळजे साहेब व सर्व स्टफ तसेच पंच नं.2 श्री. विष्णु येवले असे आले व श्री. पिल्ले यांचे विरुध्द सापळा लावण्यात आला. सर्व जण एकमेकाचे दिसतील अशा प्रकारे थांबले. तेव्हा मी पायी-पायी प्रिन्स हटेल येथे आलो. माझ्या पाठीमागे पंच क्रमांक 1.श्री बहुरे व सापळा पथकातील पोलीस उपअधीक्षक श्री. निकाळजे साहेब व स्टाप असे आले. व मी पिन्स लज मध्ये आलो असतांना तेथील चनल गेटच्या आतमध्ये श्री. पिल्ले साहेब यांनी माझेकडुन सव्वा ते दिड वाजेचे सुमारास सात हजार रुपये घेतले. त्यानी माझ्याकडील लाचेचे पैसे घेवुन त्यांचे पँटचे उजव्या खिशामध्ये ठेवले. त्यावेळी पंच श्री. दारासिंग बहुरे हे समक्ष हजर होते. त्यानंतर मी सापळा पथकास आधी ठरल्या प्रमाणे डोक्याला बांधलेला रुमाल गळयात टाकुन इशारा केला तेव्हा पोलीस उपअधीक्षक श्री. निकाळजे साहेब व स्टफ तसेच पंच नं.2 श्री. विष्णु येवले असे लगेच पाठीमागुन त्याठिकाणी येवुन पोलीस जमादार श्री.पिल्ले यांना ताबडतोब पकडले. पोलीस उपअधीक्षक श्री. निकाळजे साहेब यांनी अंबड पोलीस स्टेशनचे पोलीस जमादार श्री पिल्ले यांना त्यांची स्वत:ची व सर्वांची ओळख करुन दिली. पोलीस जमादार श्री पिल्ले यांना त्यांचे नाव विचारले असता त्यांनी त्यांचे पुर्ण नाव जन पांडीयन पिल्ले, वय 51वर्षे, व्यवसाय पोलीस हवालदार, ब.न.1018 नेमणुक पोलीस ठाणे अंबड असे सांगीतले. तेव्हा त्याची तेथेच पंचासमक्ष अंगझडती घेवुन त्यांनी स्वीकारलेली लाचेची रक्कम सात हजार रुपये पंचासमक्ष जप्त केले व मला पोलीस उपअधीक्षक श्री निकाळजे साहेब यांनी सरकारी गाडी जवळ बोलावुन त्याठिकाणी माझे जवळील व्हाईस रेकर्डर कर्मचारी श्री.म्हस्के यांनी बंद केला व माझे हात तपासण्यात आले. त्यानंतर पोलीस उपअधीक्षक श्री निकाळजे साहेब, स्टॉफ, दोन्ही पंच, मी व पोलीस हवालादार श्री पिल्ले यांना सोबत घेवुन लाचलुचपत प्रतिबंधक विभाग जालना येथे आलो. सर्व घटने बाबतचा सविस्तर पंचनामा करण्यात आला.तरी दिनांक 13.05.2020 रोजी 13.21 वा. अंबड येथील प्रिन्स लज येथे मला व माझ्या कुटुंबियांना गुन्हयात अटक न करण्यासाठी व सदर गुन्हयात मदत करण्यासाठी पंच श्री. दारासिंग बहुरे यांचे समक्ष 7,000/- रुपयेची लाच स्विकारली तेव्हा त्यांना रंगेहात पकडण्यात आले आहे. म्हणुन त्यांचेवर कायदेशीर कार्यवाही करावी ही विनंती.अशोक कारभारी पवार

**13.Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at**
**(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

**(1) Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): **or** (किंवा)

**(2) Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव): RAVINDRA DEVIDAS NIKALJE

**Rank (पद):** I (Inspector)

**No.(क्र.):** PI **to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

**(3) Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

Scanned by CamScanner

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

**(4) Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

**14.Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

**15. Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिकारी यांची सही)

**Name** (नाव): ANIRUDHA Shyamsundar
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): POBN58647

Scanned by CamScanner